SAMPLE CONTENT

CCE Pattern

# मराठी बालभारती व्यवसाय



इयत्ता सातवी
(मराठी माध्यम)

Target Publications Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये नियोजित नवीन अभ्यासक्रमावर आधारित.

## इयत्ता सातवी

# मराठी बालभारती

# व्यवसाय

**प्रमुख वैशिष्ट्ये:**

- नवीन अभ्यासक्रमावर आधारित.
- CCE अभ्यासपद्धतीवर आधारित प्रश्नांची मांडणी.
- वैविध्यपूर्ण संकलित, तसेच आकारिक प्रश्नप्रकारांचा समावेश.
- लेखन सरावासाठी मुबलक जागा.
- स्वयंमूल्यमापनासाठी चार घटक चाचण्या व दोन सत्रांत सराव प्रश्नपत्रिका अंतर्भूत.

नाव : ____________________

शाळा : ____________________

इयत्ता : __________ तुकडी : __________ हजेरी क्रमांक : __________

Printed at: **Jasmine Art Printers Pvt. Ltd.,** Navi Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 64214

**10931_11831_JUP**

SAMPLE CONTENT

# प्रस्तावना

शिक्षण मंडळाने नव्याने विकसित केलेला इयत्ता ७ वी 'मराठी बालभारती'चा अभ्यासक्रम फार कल्पक व मुलांच्या संकल्पना अधिक स्पष्ट करणारा आहे. या अभ्यासक्रमावर आधारित **टार्गेट प्रकाशनाचा इयत्ता ७ वी मराठी बालभारती व्यवसाय** विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हांला आनंद होत आहे.

या विषयाचा संपूर्ण सराव व्हावा हा या व्यवसायाचा मुख्य उद्देश आहे. CCE अभ्यासपद्धतीनुसार, प्रत्येक पाठाचे संकलित मूल्यमापन व आकारिक मूल्यमापन असे विभाग केले आहेत. संकलित मूल्यमापनातील प्रश्नप्रकारांमुळे पाठाचे आकलन सुलभरीत्या होण्यास मदत होईल, तर आकारिक मूल्यमापनातील वैविध्यपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देतील अशी आम्हांला खात्री आहे. या अभ्यासक्रमातील कविता मुलांचे भावविश्व उलगडणाऱ्या आहेत, त्यामुळे त्यांचे उत्तम आकलन व्हावे यासाठी प्रत्येक कवितेच्या सुरुवातीला कवितेचा सविस्तर भावार्थ दिला आहे, तसेच जास्तीत जास्त शब्दार्थ, वाक्प्रचार व टिपा यांचा समावेश केला आहे; जेणेकरून मुलांना पाठाचा अर्थ समजून घेणे सोपे होईल. पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त अधिकच्या प्रश्नांचा समावेश केल्याने पाठाचा उत्तम सराव होईल.

भाषेचा पाया असणाऱ्या व्याकरणाचा पुरेपूर सराव व्हावा याकरता व्याकरणावर आधारित मुबलक प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. नवीन अभ्यासक्रमाची मांडणी ही विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये विकसित करण्याच्या दृष्टीने केली गेली आहे, म्हणूनच विद्यार्थ्यांची लेखनशैली समृद्ध व्हावी याकरता निबंधलेखन, पत्रलेखन, संवादलेखन, जाहिरातीवरून प्रश्नोत्तरे सोडवणे यांवर आधारित प्रश्न अंतर्भूत केले आहेत. प्रश्नांची उत्तरे सुटसुटीतपणे लिहिता यावीत यासाठी पर्याप्त जागा दिली आहे.

अभ्यास करताना आपली तयारी जोखणंही महत्त्वाचं असतं, त्यामुळे पाठांवर आधारित चार घटक चाचण्या व दोन सत्रांत परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचा यात समावेश आहे. विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यमापनासाठी या प्रश्नपत्रिका साहाय्यकारी ठरतील. विद्यार्थ्यांची मराठी भाषेची समज व रुची वाढवण्यात हा व्यवसाय यशस्वी ठरेल अशी आम्हांला खात्री वाटते.

हे पुस्तक उत्कृष्ट व्हावे यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी यात काही कमतरता असल्यास आपल्या सूचना नेहमीच स्वागतार्ह आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपला अभिप्राय आम्हांला पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवावा : mail@targetpublications.org

नावीन्यपूर्ण अभ्यासासाठी मुलांना खूप खूप शुभेच्छा !

प्रकाशक

SAMPLE CONTENT

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | जय जय महाराष्ट्र माझा (गीत) | राजा बढे | १ |
| २. | स्वप्नं विकणारा माणूस | अशोक कोतवाल | ५ |
| ३. | तोडणी | दत्तात्रय विरकर | १७ |
| | भाषेचा नमुना- अहिराणी बोली | दिलीप धोंडगे | २७ |
| ४. | श्रावणमास (कविता) | बालकवी | २९ |
| ५. | भांड्यांच्या दुनियेत | - | ३७ |
| | घटक चाचणी - १ | | ४७ |
| ६. | थोरांची ओळख – डॉ. खानखोजे | वीणा गवाणकर | ४९ |
| ७. | माझी मराठी (कविता) | मृणालिनी कानिटकर-जोशी | ५९ |
| ८. | गचकअंधारी | अशोक मानकर | ६६ |
| ९. | नात्याबाहेरचं नातं | सुभाष किन्होळकर | ७८ |
| १०. | गोमू माहेरला जाते (गीत) | ग. दि. माडगूळकर | ९० |
| | भाषेचा नमुना- कुपारी बोली (कोकणी) | सिरील मिनेझीस | ९६ |
| | घटक चाचणी - २ | | ९८ |
| | प्रथम सत्रांत परीक्षा | | १०० |
| ११. | बाली बेट | पु. ल. देशपांडे | १०२ |
| १२. | सलाम-नमस्ते ! | सुधा मूर्ती | ११४ |
| १३. | अनाम वीरा... (कविता) | कुसुमाग्रज | १२३ |
| १४. | कवितेची ओळख | शारदा दराडे | १३१ |
| १५. | असे जगावे (कविता) | गुरू ठाकूर | १३८ |
| | घटक चाचणी - ३ | | १४५ |
| १६. | कोळीण | मारुती चितमपल्ली | १४७ |
| १७. | थेंब आज हा पाण्याचा (कविता) | सुनंदा भावसार | १५५ |
| १८. | वदनी कवळ घेता... | - | १६३ |
| १९. | धोंडा | डॉ. संजय ढोले | १७० |
| २०. | विचारधन | - | १८१ |
| २१. | संतवाणी | संत नरहरी सोनार, संत कान्होपात्रा | १८२ |
| | घटक चाचणी - ४ | | १८४ |
| | द्‌वितीय सत्रांत परीक्षा | | १८६ |


टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.

SAMPLE CONTENT

# ३. तोडणी

लेखक – दत्तात्रय विरकर

**शब्दार्थ**

| | | | |
|---|---|---|---|
| आलू | आलो | धुडके | मोठा फडका |
| इचार | विचार | परक्या | अनोळखी |
| उत्कंठा | उत्सुकता | पाचट | उसाचा वाळलेला पाला, उसाचे चिपाड |
| उलगडा | उकल | पाचूंदा | कडब्याचा पाच पेंढ्यांचा गट |
| कोप्या | खोपट्या, शेतातील गवताच्या झोपड्या | पेंडके | भारा |
| खुटून | एकाच जागी खिळून | पैकं | पैसे |
| गवसणे | सापडणे. | पोचारा | पाण्याचा हबका |
| गुंड | येथे अर्थ – छोटे वाटोळे भांडे | फुपाटा | धूळ भरलेला रस्ता |
| जर्मनचे पातेले | ॲल्युमिनिअमसारख्या एका धातूचे भांडे | म्हंत्यात | म्हणतात |
| जू | जोखड, बैलाच्या मानेवरचे लाकूड | वळकटी | गुंडाळी |
| जोगणे | चारा खाऊन तृप्त होणे, पुष्ट होणे. | वाढे | उसाचा शेंडा |
| जोश | उत्साह, जोम | शिलगावणे | पेटवणे |
| झिरा | झरा, ओहळ | सडक | रस्ता |
| तुपलं | तुमचं, तुझं | समदी | सगळे |
| तोडी | कापणी, छाटणी | सरमड | बाजरीचे ताट, कडबा (बैलांचा चारा) |
| थळ | लागवड, बन | साळलेल्या | खरचटलेल्या, सोललेल्या |

**वाक्प्रचार व त्यांचे अर्थ**

| | | | |
|---|---|---|---|
| आनंदाला पारावार न उरणे. | खूप आनंद होणे. | दिवस माथ्यावर येणे. | दुपार होणे. |
| आबाळ होणे. | हेळसांड होणे, हाल-अपेष्टा होणे. | मनात काहूर उठणे. | कावरेबावरे होणे, अस्वस्थ होणे. |
| उलघाल होणे. | अस्वस्थ, बेचैन होणे. | वाटेला लागणे. | आपापल्या मार्गाने जाणे. |
| (अंग) काकडून निघणे. | थंडीने गारठणे. | साद घालणे. | हाक देणे. |
| खुटून बसणे. | रूसून बसणे. | हबकून जाणे. | घाबरून जाणे, धक्का बसणे. |
| गाडी रुळावर येणे. | स्थिरस्थावर होणे. | हातभार लावणे. | मदत करणे. |
| तांबडं फुटणे. | सकाळ होणे. | | |

**टिपा**

| | |
|---|---|
| 'तमसो मा ज्योतिर्गमय' | आम्हांला अंधारातून प्रकाशाकडे ने अशा अर्थाची दीपज्योतीला केलेली प्रार्थना. |
| साखरशाळा | ऊसतोडणी कामगारांच्या मुलांची शाळा. |

## पाठ परिचय

दत्तात्रय विरकर लिखित 'तोडणी' या पाठात वसंत व मीरा या ऊसतोडणी कामगारांच्या मुलांची शिक्षणाविषयीची तीव्र कळकळ व्यक्त झाली आहे. ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी करावी लागणारी अंगमेहनत व शाळा सुटू नये म्हणून करावी लागणारी खटपट हे वास्तव यात चित्रित केले गेले आहे.

SAMPLE CONTENT

## संकलित मूल्यमापन

### पाठाधारित प्रश्नोत्तरे

**१ कंसातील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

i. दामूनंही आपली बैलं ------------------ पाणी पाजून आणली. (नदीवरून, विहिरीवरून, तळ्यावरून)

ii. मीरा अन् ------------------ झिऱ्यावर पाण्यासाठी नंबर लावला होता. (सुदामानं, वसंतानं, कृष्णानं)

iii. मीरानं पाट्यावर ------------------ वाटण वाटून आईकडे दिलं. (पुरणाचं, डाळीचं, मिरचीचं)

iv. सडकेवर पडलेल्या ------------------ वसंतची नजर खिळली. (दगडावर, पुस्तकावर, कागदावर)

**२ आकृती पूर्ण करा.**

वसंतची आई — वसंतचे वडील — वसंतची बहीण

१ | २ | ३

उत्तर: १. ------------------ २. ------------------

३. ------------------

**३ खालील आकृतीत योग्य शब्द लिहा.**

*i. बैलांचे खाद्य. ------------------

*ii. ऊसतोडणी कामगारांच्या मुलांची शाळा. ------------------

iii. पहाट होताच अंग झटकून कामास लागणारी. ------------------

iv. वसंतला 'तमसो मा ज्योतिर्गमय' चा अर्थ सांगणारी. ------------------

**४ विधान सत्य की असत्य ते लिहा.**

i. शंकर लाकूड तोडण्याचे काम करत होता. ------------------

ii. मीराचे शिक्षण आठवीपर्यंत झाले होते. ------------------

iii. वसंताला शिक्षणाची गोडी नव्हती. ------------------

**५ कोण कोणास म्हणाले, ते लिहा.**

**i. "आवं पाचूंदा सोडा."**

उत्तर: ------------------

SAMPLE CONTENT

ii. "आता पनबीन काय बी सांगू नगंस उद्यापास्नं त्येला साळंला धाड."

उत्तर:

iii. "आता तू उद्यापास्नं साळंला जायचं बरं का !"

उत्तर:

## ६ एका वाक्यात उत्तरे लिहा.

i. ऊसतोडणीच्या पहिल्या दिवशी थळातून लवकर परतायचे, असे सगळ्यांनी का ठरवले?

उत्तर:

ii. वसंत हबकून का गेला होता?

उत्तर:

iii. सडकेवर सापडलेल्या कागदावर काय लिहिले होते?

उत्तर:

iv. मीराच्या आनंदाला पारावार का उरला नाही?

उत्तर:

## ७ थोडक्यात उत्तरे लिहा.

i. शंकरने वसंतचे शिक्षण का तोडले होते?

उत्तर:

ii. वसंतला शाळेत पाठवण्यासाठी सर्वांनी शंकरची कशी समजूत घातली?

उत्तर:

SAMPLE CONTENT

*८ तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.

i. मीराने वसंतला 'तमसो मा ज्योतिर्गमय' चा सांगितलेला अर्थ.

उत्तर:

ii. वसंतच्या मनातील शिक्षणाची ओढ.

उत्तर:

SAMPLE CONTENT

iii. 'अगं, पण दादानंच शिक्षण तोडलं तवा वाचायला तरी कसं येणार?' या वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ.

उत्तर:

iv. तुम्हांला कथेतील कोणते पात्र सर्वांत जास्त आवडले? सकारण सांगा.

उत्तर:

SAMPLE CONTENT

*९ खालील आकृतीत दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे माहिती लिहा.

मराठी शाळेजवळच्या मोकळ्या मैदानात गाड्या सोडल्यावर खालील व्यक्तींनी काय काय केले?

| मीरा, वसंत | इतर बायका | दामू | तारा |
| --- | --- | --- | --- |
| | | | |

उत्तर:

*१० वसंतचे शिक्षणाबाबतचे प्रेम दर्शवणारी वाक्ये पाठातून शोधून लिहा.

उत्तर:

SAMPLE CONTENT

## भाषाभ्यास व व्याकरण

१ गटात न बसणारा शब्द ओळखा.

*i. श्रीमंत , धनवान, गरीब, लखपती.

*ii. रात्र, निशा, प्रभात, यामिनी.

*iii. अशिक्षित, निरक्षर, अंगठाबहाद्दर, शिक्षित.

*iv. गवसणे, मिळणे, हरवणे, सापडणे.

v. कालवण, आमटी, सार, फोडणी.

vi. अंधार, काळोख, तिमिर, उजेड.

उत्तर: i. ii. iii.

iv. v. vi.

२ खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

i. साद =

ii. स्तुती =

iii. गाव =

iv. आबाळ =

v. नदी =

vi. जोश =

vii. सडक =

viii. उत्कंठा =

३ खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. अंधार ×

ii. लवकर ×

iii. अडाणी ×

## ४ खालील शब्दांचे लिंग बदलून त्यांचा वाक्यात उपयोग करा.

i. बैल ii. ताई iii. मित्र

उत्तर: i.

ii.

iii.

## ५ खालील शब्दांचे वचन बदलून लिहा.

i. शेपटी –
ii. नदी –
iii. भाकऱ्या –
iv. चिठ्ठी –
v. गाड्या –
vi. मोळी –
vii. शाळा –

## *६ कंसात दिलेल्या वाक्प्रचारांच्या रूपात योग्य बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.

(आनंदाला पारावार न उरणे, हबकून जाणे, हातभार लावणे, आबाळ होणे.)

i. वडिलांच्या नोकरीनिमित्त सतत होणाऱ्या बदल्यांमुळे केशवच्या शिक्षणाची .

ii. गावाहून आलेल्या आजीला पाहून नंदाच्या .

iii. सिमरन आईला घरातल्या कामांसाठी .

iv. लहानग्या रेशमाच्या अंगावर कुत्रा चावल्याची खूण पाहताच आई .

## ७ खालील वाक्प्रचार व त्यांच्या अर्थाच्या योग्य जोड्या जुळवा.

| | 'अ' गट | उत्तर | | 'ब' गट |
|---|---|---|---|---|
| i. | मनात काहूर उठणे | | अ. | हाक देणे |
| ii. | अंग काकडून निघणे | | ब. | रुसून बसणे |
| iii. | वाटेला लागणे | | क. | अस्वस्थ होणे |
| iv. | उलघाल होणे | | ड. | आपापल्या मार्गाने जाणे |
| v. | खुटून बसणे | | इ. | थंडीने अंग गारठणे |
| vi. | साद घालणे | | फ. | कावरेबावरे होणे |

SAMPLE CONTENT

## *८ खालील शब्दांत लपलेला अर्थ शोधून लिहा.

i. तांबडं फुटलं. – ----------------

ii. गाडी रुळावर आली. – ----------------

iii. अंधाराकडून उजेडाकडे. – ----------------

iv. चूल शिलगावली. – ----------------

## *९ खालील वाक्ये प्रमाणभाषेत लिहा.

**i. 'पोरा, मले तरी कुटं वाचता येतंय.'**

उत्तर: ----------------

**ii. "अवं समदी लेकरं साळंला गेली आन् तुपलं?"**

उत्तर: ----------------

**iii. "आता तुमी समदीच म्हंत्यात, तर म्या तरी कशाला आडवा येवू?"**

उत्तर: ----------------

**iv. 'आता म्या साळंला येणार.'**

उत्तर: ----------------

## १० खालील शब्दांना 'पर' हा एकच शब्द जोडून नवीन अर्थपूर्ण शब्द तयार होतात. ते बनवा. मराठी भाषेतील अशा विपुल शब्दसंपत्तीचा अभ्यास करा. त्याप्रमाणे वेगवेगळे शब्द तयार करा.

*i. **पर**

- प्रांत — उदा. परप्रांत
- भाषा — ----------------
- देश — ----------------
- ग्रह — ----------------
- राष्ट्र — ----------------

ii. **दर**

- रोज — ----------------
- साल — ----------------
- मजल — ----------------
- शेकडा — ----------------
- महा — ----------------

SAMPLE CONTENT

### मुक्तोत्तरी प्रश्न

*१ साखरशाळेत जाणाऱ्या राजेशला तुम्ही अभ्यासाबाबत कोणती मदत कराल?

उत्तर:

### तोंडी परीक्षा

१. वसंतच्या शिक्षणाविषयी कोण उदासीन होते?

२. सर्व तोडणीवाल्यांनी बैलगाड्या कोठे सोडल्या?

३. या पाठात कोणत्या बोलीभाषेचा वापर केला आहे?

४. शंकरच्या मुलांची नावे सांगा.

## आकारिक मूल्यमापन

### मौखिक कार्य

१ शिक्षण घेणे का गरजेचे आहे, असे तुम्हांला वाटते?

२ कापणी, तोडणीच्या वेळी वापरली जाणारी शेतीची दोन अवजारे सांगा.

### लेखी कार्य

*१ माहिती मिळवूया.

i. साखरशाळा कोणत्या मुलांसाठी असते?

उत्तर:

ii. ही शाळा कोठे भरते?

उत्तर:


iii. साखरशाळा कशासाठी सुरू झाल्या आहेत?

उत्तर:

SAMPLE CONTENT

***२ खालील विषयासंदर्भात तुमच्या मनातील भावना व्यक्त करा.**




उत्तर: ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**३ शेतीच्या खालील कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांची माहिती घ्या व नावे लिहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ९)

i. खुरपणी – ------------------------------

ii. बांध घालणे – ------------------------------

iii. पेरणी – ------------------------------

iv. नांगरणी – ------------------------------

## उपक्रम / प्रकल्प

***१ 'सा विद्या या विमुक्तये' हे ब्रीदवाक्य आहे. प्रत्येक संस्थेला, शाळेला, मंडळाला आपले स्वत:चे असे ब्रीदवाक्य असते. अशी ब्रीदवाक्ये मिळवा. या ब्रीदवाक्यांचा अर्थ समजून घ्या.**

**श्रेणी:** ------------

अ - उत्तम ◯ शिक्षकांचा शेरा: ------------------------------

ब - चांगले ◯ ------------------------------

क - समाधानकारक ◯ दिनांक: ------------ स्वाक्षरी: ------------

SAMPLE CONTENT

# इयत्ता सातवी
## व्यवसाय




**AVAILABLE SUBJECTS:**

- My English Book
- हिंदी सुलभभारती
- मराठी बालभारती
- गणित
- सामान्य विज्ञान
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल

BUY NOW

### ठळक वैशिष्ट्ये :

- प्रभावी संकल्पनांची उभारणी तसेच भरपूर सराव करण्याकरता उपयुक्त
- भरपूर सरावासाठी पाठाखालील प्रश्नांचा परिपूर्ण समावेश
- विद्यार्थ्यांच्या स्वयंमूल्यमापनासाठी गणितामध्ये पाठाची उजळणी व भाषा विषयांमध्ये घटक चाचण्यांचा समावेश
- विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी अधिक प्रश्नांचा, तोंडी परीक्षेचा तसेच कृती / प्रकल्पांचा समावेश

Target Publications Pvt. Ltd.

88799 39712 / 13 / 14 / 15
mail@targetpublications.org
www.targetpublications.org